



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २८२, शनिवार २७ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# राजे शिवाजी पतसंस्थेचे ठेवीदार नगर-पुणे महामार्ग रोखणार!

## संचालक मंडळावर एमपीआयडी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी

**कान्हूरपठार : प्रतिनिधी**

**कान्हूरपठार येथील राजे शिवाजी पतसंस्थेमध्ये झालेल्या कोट्यवधीचा रूपयांच्या अफरातफरीमुळे ठेवीदारांना त्यांच्या ठेवींचे पैसे परत मिळत नसल्याने संचालक मंडळावर महाराष्ट्र वित्तीय संस्थांमधील हितसंबंधाचें संरक्षण अधिनियम १९९९ नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे. येत्या ५ ऑगस्टपर्यंत गुन्हा न दाखल झाल्यास ८ ऑगस्ट रोजी नगर-पुणे महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

यासंदर्भात ठेवीदारांच्या वतीने बुधवार दि.२४ जुलै रोजी पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनात आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राजे शिवाजी पतसंस्थेतील अफरातफरीसंदर्भात २९ मे रोजी पारनेरचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर तसेच दि. १८ जुन रोजी पोलीस अधीक्षकांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. मात्र त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही.

निवेदनात पुढे नमुद करण्यात आले आहे की, संस्थेचे चेअरमन आझाद प्रभाकर ठुबे यांनी स्वतः व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे साधारण ६० ते ७० कोटी रूपये विना तारण कर्ज घेतलेले आहे. हे कर्ज थकीत होउन त्याचा भरणा न केल्याने ठेवीदारांच्या ठेवींच्या मुदती संपूणही परत मिळत उर्वरीत पान ३ वर




### संचालक मंडळाचे धाबे दणाणले

**आझाद ठुबे यास सावकरी गुन्हयाप्रकरणी अटक झाल्यानंतर आता संस्थेतील अफरातफरीमुळे महाराष्ट्र वित्तीय संस्थांमधील हितसबंधाचे संरक्षण कायदा अधिनियम १९९९ नुसार चेअरमन, व्हा. चेअरमन, कार्यकारी संचालक तसेच संचालक मंडळावर गुन्हा दाखल होण्याची टांगती तलवार आहे. त्यामुळे संचालक मंडळाचे धाबे दणाणले आहे. संस्थेमधील अफरातफरीशी काही संचालकांचा सबंध असला तरी अनेक जणांचा त्याच्याशी काहीही सबंध नसतानाही केवळ संचालक म्हणून त्यांच्यावर होणारी कारवाई मात्र अटळ आहे.**

### आझाद ठुबेच्या कोठडीत दोन दिवसांची वाढ

**सावकारी कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्हयाप्रकरणी राजे शिवाजी पतसंस्थेचा फरार चेअरमन आझाद ठुबे यास पोलीसांनी त्याच्या राहत्या घरातून अटक केल्यानंतर त्यास दि.२५ जुलै पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. गुरूवारी त्यास पुन्हा न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्याच्या पोलीस कोठडीत आणखी दोन दिवसांची वाढ केली.**

# सावेडीचे तलाठी, मंडलाधिकारी निघाले लाचखोर!

## मार्च महिन्यात केलेल्या लाचेच्या मागणीचा जुलैमध्ये गुन्हा

**नगर : प्रतिनिधी**

**प्लॉटच्या फेरफार नोंदी करण्यासाठी ४० हजारांची लाच स्विकारल्याप्रकरणी नगरच्या सावेडीच्या मंडलाधिकारी शैलजा राजाभाऊ देवकाते व तलाठी सागर एकनाथ भापकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मार्च महिन्यात केलेल्या लाचेच्या मागणीचा गुन्हा थेट जुलै महिन्यात दाखल करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**

यासंदर्भात लाचलुचपत विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ५४ वर्षीय पुरूष तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांच्या संयुक्त नावे नगरमधील सावेडी उपनगरात १८ हजार चौरस फुट आकाराचा प्लॉट आहे. या प्लॉटचे नगर महानगरपालिकेकडील शासकीय रेखांकन करून या प्लॉटवर बांधकाम करण्यासाठी २२ स्वतंत्र उपविभागणी करण्यात आलेली आहे. या प्लॉटच्या ऑनलाईन फेरफार नोंदी करण्यासाठी तलाठी भापकर याने पंचांसमक्ष तक्रारदारांकडे ४० हजार रूपयांची मागणी केली.




तडजोडीअंती ४० हजार रूपये स्विकारण्याची तयारी दर्शविली. तर मंडलाधिकारी देवकाते यांनी प्लॉटच्या फेरफार नोंदी मंजुर करण्यासाठी ४४ हजार रूपयांची लाचेची रक्कम स्विकारल्याचे मान्य करून तलाठी भापकर याच्यासाठी प्रत्येकी ५०० रूपये प्रमाणे २२ प्लॉटसाठी ११ हजार रूपये लाचेची मागणी केली म्हणून दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उर्वरीत पान ३ वर

# करोनानंतर हंता विषाणूची दहशत; उंदरांकडून पसरतोय जीवघेणा आजार

## चौघांचा मृत्यू । काय आहेत लक्षणं ?

**वॉशिंग्टन : वृत्त संस्था**

**करोना संकटातून जग बाहेर पडलेलं असताना, त्या संकटाच्या कटू आठवणी अद्याप ताज्या असताना आता हंता विषाणूनं चिंता वाढवली आहे. अमेरिकेत हंता विषाणूमुळे ४ जणांचा मृत्यू झाला आहे.**



**हा विषाणू उंदरांमुळे पसरतो. हंता विषाणूमुळे जीवघेणा आजार होतो. त्याच्यामुळे फुफ्फुसांवर परिणाम होतो. हंताची लक्षणं संक्रमित व्यक्तींमध्ये १ ते ८ आठवड्यानंतर दिसू लागतात.**

हंता विषाणूमुळे अमेरिकेत चौघांचा जीव गेला आहे. हा विषाणू उर्वरीत पान ३ वर

# लाडक्या बहीणींना पैसे देणार कोठून?

## अजितदादांच्याच अर्थ मंत्रालयाचा आक्षेप । ८ लाख कोटींचे कर्ज असताना योजना कशासाठी?

**मुंबई : प्रतिनिधी**

**अर्थमंत्री अजित पवारांनी गेल्या महिन्याच्या अखेरीस अर्थसंकल्प मांडला. त्यात त्यांनी अनेक योजनांची घोषणा केली. यापैकी लाडकी बहीण योजना सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना आणण्यात आल्याचे अजित पवारांनी सांगितले. या योजनेच्या माध्यमातून महिलांना महिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतील. त्याचा पहिला हफ्ता रक्षाबंधनाच्या सुमारास मिळेल असे सरकारकडून सांगण्यात आले. या घोषणेनंतर महिलांनी अर्ज भरण्यासाठी गर्दी केली. राज्यभर अर्ज भरले जाऊ लागले.**




राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेवर आता अर्थ मंत्रालयाने आक्षेप घेतला आहे. राज्यावर ८ लाख कोटींचे कर्ज असताना योजना कशी राबवायची, असा प्रश्न मंत्रालयाकडून उर्वरीत पान ३ वर


नाना

गोरगरीब जनतेचे कैवारी
म्हणून तुमची ओळख होती,
तुमचा तोच वारसा जपायचा
आम्ही प्रयत्न करतोय...



स्व.मार्तंडनाना पठारे
यांना स्मृतीदिनी
विनम्र अभिवादन !



सुदेश आबूज

खासदार नीलेश ज्ञानदेव लंके अ.नगर लोकसभा मतदारसंघ
राणीताई नीलेश लंके मा.सदस्या जि.प.नगर
खा.शरदचंद्र पवार साहेब ज्येष्ठ नागरिक संघ,पारनेर

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती
# शिवार

# धान्य साठवणीतील कीड नियंत्रण

**मागील हंगामातील उत्पादनांची साठवण अधिक काळजीपूर्वक करण्याची आवश्यकता आहे. धान्यावर तांदळातील सोंड किडा, छोटे भुंगेरे, खापरा भुंगा, दातेरी भुंगा, कडधान्यातील भुंगा, पतंग, तांबडा भुंगा इत्यादी किडींचा प्रादुर्भाव वाढून नुकसान होऊ शकते.**

## प्रादुर्भाव होण्याची प्रमुख कारणे...

- धान्याचे तापमान : धान्यातील कीटक २० ते ४० अंश सेल्सिअस तापमानाच्या कक्षेतच क्रियाशील राहू शकतात.
- धान्यातील ओलावा : ८ ते १० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास किडींचा प्रादुर्भाव वाढतो.
- शेतातील प्रादुर्भाव : काही कीटक शेतातच पक्व अवस्थेतील दाण्यांवर अंडी घालतात. अशा धान्याच्या साठवणीत पोषक हवामान मिळताच अळी बाहेर येते. धान्य खाण्यास सुरुवात करते.
- साठवणीच्या कोठ्या किंवा पोती यांची अस्वच्छता : दरवर्षी वापरल्या जाणाऱ्या पोत्यांमध्ये कीटक व त्यांची अंडी तशीच राहून प्रादुर्भाव वाढू शकतो.
- साठवणीच्या जागी भेगा व छिद्रे : यामध्ये किडींना लपण्यासाठी, सुप्तावस्थेसाठी जागा मिळते. तसेच त्यात अडकवलेले धान्य खाद्य म्हणून उपलब्ध होते.

### धान्याचे नुकसान कशामुळे होते ?

- दाण्यातील ओलावा व कुबट वास : २ ते ३ टक्के
- बियाण्यातील विविध किडी : २.५ टक्के
- उंदीर : २.५ टक्के
- बुरशीजन्य रोग : २ ते ३ टक्के



# योग्य पद्धतीने धान्याची साठवण

**सामान्यपणे वर्षभरासाठी लागणारे धान्य जसे, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी इत्यादींची साठवणूक करून ठेवली जाते. कोणत्याही धान्याचा साठा करून ठेवताना योग्य काळजी घेणे आवश्यक असते. अनेक वेळा वातावरणातील बदलामुळे किंवा साठवणुकीत योग्य काळजी न घेतल्यामुळे कीड किंवा बुरशी लागून धान्य खराब होते. धान्यामध्ये ८ ते १० टक्क्यांपेक्षा जास्त ओलावा असल्यास किडींचा प्रादुर्भाव वाढतो. कीड आणि बुरशी लागलेले धान्य खाण्यायोग्य राहत नाही. तसेच दाण्यांचे वजन कमी झाल्यामुळे योग्य बाजारभाव मिळत नाही. त्यासाठी धान्य साठविताना योग्य ती काळजी घेऊन वेळीच उपाययोजना केल्यास संभाव्य नुकसान टाळता येते. धान्य साठवणुकीवेळी किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विविध कीटकनाशकांचा वापर केला जातो. त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. संभाव्य नुकसान टाळण्यासाठी धान्य साठविताना घरगुती स्तरावर विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे फायद्याचे ठरते.**

## प्रतिबंधात्मक उपाय

- धान्य मळणीसाठी शक्यतो लोकवस्ती आणि धान्य साठवणुकीच्या जागेपासून दूर अशी जागा निवडावी. तसेच निवडलेली जागा स्वच्छ आणि किडीपासून मुक्त असावी.
- मळणी केल्यानंतर धान्य उन्हामध्ये चांगले वाळवून घ्यावे. धान्यातील ओलाव्याचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असावे. ओलाव्याचे प्रमाण जास्त असल्यास धान्याला कीड लागण्याची शक्यता असते.
- धान्याची पोती जमिनीवर रचून ठेवू नयेत. जमिनीवर साठविल्यामुळे धान्य जमिनीतील उपलब्ध ओलावा शोषून घेते. परिणामी, धान्य चांगले वाळविलेले असून देखील त्यातील ओलाव्याचे प्रमाण वाढते.
- धान्य साठवणीपूर्वी त्यातील किडलेले, खराब दाणे चाळून आणि उधळणीद्वारे वेगळे करावेत.
- धान्य साठवणुकीसाठी आधुनिक हवाबंद कोठ्या वापराव्यात. जेणेकरून धान्याला कीड लागली तरी हवेचा पुरवठा न झाल्यामुळे कीड आपोआपच मारली जाईल.
- साठवणुकीसाठी वापरलेल्या पारंपरिक कोठार किंवा कणगीला असलेली छिद्रे चुन्याने बुजवून घ्यावीत.
- धान्य साठवणुकीची जागा आणि आजूबाजूचा परिसर झाडून, धुऊन स्वच्छ करावा. सर्व काडीकचरा जाळून नष्ट करावा.
- साठवणुकीच्या खोलीमध्ये उंदरांनी पाडलेली बिळे काचेचा चुरा भरून नंतर सिमेंटने बंद करावा. जेणेकरून उंदरांना पुन्हा सहजरीत्या बिळे पाडता येणार नाहीत.
- धान्य साठवणुकीच्या जागी पावसाळ्यात पाणी येणार नाही याची काळजी घ्यावी.
- धान्य साठवणुकीसाठी शक्यतो लोखंडी किंवा धातूपासून बनविलेल्या पत्र्याच्या कोठ्या वापराव्यात.
- धान्य साठवणीच्या कोठ्या किंवा पोती स्वच्छ धुऊन काही वेळ उन्हात ठेवाव्यात. दरवर्षी वापरल्या जाणाऱ्या पोत्यांमध्ये कीटक व त्यांची अंडी तशीच राहून प्रादुर्भाव वाढू शकतो. पोषक वातावरण तयार होताच कीडमुक्त धान्याला देखील पुन्हा कीड लागण्याची शक्यता असते.
- साठवणीच्या गोण्या किंवा पोती गरम पाण्यात ५० ते ५५ अंश सेल्सिअस तापमानाला १० ते १५ मिनिटे भिजवून नंतर वाळवावीत. आणि नंतर त्यात धान्य भरावे.
- धान्य भिंतीपासून ३ फूट उंचीवर साठवावे. कारण पावसाळ्यात भिंतीतील ओलावा धान्य शोषून घेते. परिणामी, धान्यातील ओलाव्याचे प्रमाण वाढून ते खराब होते.

## घरगुती उपाययोजना

- कडुलिंबाची पाने : धान्याला लागणारी कीड बहुगुणी कडुलिंबाच्या पानांचा वापर करून रोखता येते. यासाठी कडुलिंबाची पाने सावलीमध्ये वाळवून घ्यावीत. वाळलेली पाने प्लॅस्टिक किंवा कापडाच्या पिशवीत भरावीत. तत्पूर्वी पिशवीला लहान छिद्रे पाडावीत किंवा कापडात बांधावीत. ही पिशवी धान्याच्या गोण्यांमध्ये वेगवेगळ्या थरांमध्ये किंवा साठवणुकीच्या डब्यामध्ये ठेवावीत.
- लसूण : धान्याला लागणारी कीड रोखण्यासाठी लसूण प्रभावी काम करते. त्यासाठी साल न काढलेली लसणाची संपूर्ण गड्डी वापरावी. प्रथम डब्यात धान्य टाकून त्यावर लसणाची एक गड्डी आणि त्यावर पुन्हा धान्य असे साधारण थर ठेवावेत. तसेच डब्याचे झाकणही बंद राहील याची काळजी घ्यावी.
- लाल मिरच्या : धान्यातील कीड आणि अळ्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लाल मिरचीचा वापर फायदेशीर ठरतो. त्यासाठी धान्य भरताना प्रत्येक थराला ४ ते ५ लाल सुकलेल्या मिरच्या ठेवाव्यात.
- लवंग : या पद्धतीमध्ये कडुलिंबाची वाळवलेली पाने आणि लसूण समप्रमाणात घेऊन त्यात १० ते १५ लवंगा टाकाव्यात. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात थोडे पाणी टाकून कडुनिंब पाने, लसूण आणि लवंग चांगले बारीक करून घ्यावे. तयार मिश्रणाच्या मध्यम आकाराच्या गोळ्या बनवून २ ते ३ दिवस उन्हामध्ये सुकवाव्यात. या गोळ्या कापडामध्ये बांधून धान्यांच्या थरांत ठेवाव्यात. त्यामुळे कीड आणि अळींचा प्रादुर्भाव कमी होतो.
- कडुलिंबाच्या बिया : कडुलिंबाच्या बियांची पावडर ही धान्य साठवणुकीसाठी अत्यंत प्रभावीपणे काम असते. कडुलिंबाच्या बियांची पावडर धान्यात मिसळल्यास किडीपासून संरक्षण होते.
- पुदिना पानांची भुकटी किंवा राख : पुदिना पानांची भुकटी किंवा राख धान्यात मिसळल्यास किडींच्या श्वसनामध्ये अडथळा येऊन कीड मरते.
- मीठ किंवा कांदे : बऱ्याच वेळा साठवलेल्या धान्यामध्ये भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. नियंत्रणासाठी साठवणुकीवेळी धान्यात मीठ मिसळावे किंवा कांदे ठेवावेत. कांद्याच्या उग्र वासामुळे धान्याला भुंगेरे लागत नाहीत. तसेच मीठ धान्यातील अतिरिक्त पाणी शोषून घेते. त्यामुळे जिवाणूंची वाढ होत नाही.
- गोडेतेल : धान्य साठवणुकीवेळी एरंडी, भुईमूग, खोबरेल किंवा मोहरी तेल वापरल्यास किडींचा प्रादुर्भाव रोखता येतो. तेलामुळे किडींची अंडी उबण्यास प्रतिबंध होऊन उत्पत्ती थांबते. त्यासाठी १ चमचा तेल प्रति किलो धान्य याप्रमाणे चोळावे. १ क्विंटल धान्यासाठी अर्धा ते एक किलो तेल वापरावे.

## धान्य साठवणुकीच्या पद्धती

- पक्की सिमेंट व पत्र्याची बांधलेली कोठी : बियाणे व बाहेरील हवामान यांचा संपर्क कमी येतो. बियाणे ठेवण्यास आणि काढण्यास अत्यंत सोपे जाते. अशा कोठ्यांमध्ये किडींचा व बुरशीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात होतो. त्यामुळे खर्चात बचत होते.
- कच्च्या मातीची कोठी किंवा मातीची वाडगी : ग्रामीण व आदिवासी भागामध्ये मातीची वाडगी किंवा कोठ्यांचा वापर बियाणे साठवणुकीसाठी प्रामुख्याने केला जातो. मात्र, पावसाळ्यात मातीची वाडगी ओलावा धरून ठेवतात. परिणामी कीड व बुरशीचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो.
- बांबूची शेणाने सारवलेली कणगी : आदिवासी भागामध्ये बांबूच्या कणग्यांचाही वापर धान्य साठवणीसाठी होतो. यात किडींचा प्रादुर्भाव जास्त होतो.
- तागाची पोती वापरणे : धान्य, बियाणे साठवणीसाठी तागाची पोती किंवा गोण्याचा वापर प्रामुख्याने होतो. यातही किडीचा प्रादुर्भाव होतो.
- खास धान्य साठवणीच्या प्लॅस्टिक पिशव्या : कटक (ओडिशा) येथील राष्ट्रीय भात संशोधन संस्थेने तयार केलेल्या खास साठवण पिशव्यांमध्ये ५० किलोपर्यंत बियाणे साठवता येते. या प्रकारात किडींचा प्रादुर्भाव होत नाही.
- प्लॅस्टिक धाग्यापासून तयार केलेली पोती : सध्या उपलब्धता व स्वस्त असल्याने अशा पिशव्यांचा वापर वाढला आहे. मात्र, यात बियाणे जास्त काळासाठी साठवता येत नाही. अशा पिशव्यांमध्ये किडींचा व उंदरांचा प्रादुर्भाव जास्त होतो.

## असे होते धान्याचे किडीमुळे नुकसान


किडीमुळे वजनात घट, प्रत खालावणे याबरोबरच कमी तापमान व आर्द्रतेतील वाढीमुळे धान्यावर बुरशींचा प्रादुर्भाव वाढतो. धान्याची उगवण क्षमता कमी होऊन, बियाणे म्हणून वापरता येत नाही.

## कीड नियंत्रण व्यवस्थापन

मळणीपूर्वी धान्य स्वच्छ करून घ्यावे. धान्य मळणी करण्याची जागा स्वच्छ, किडींपासून मुक्त असावी. ती शक्यतो लोकवस्ती व धान्य साठवणीपासून दूर असावी. मळणी केल्यानंतर दाणे चांगले वाळवावेत. धान्यात १० टक्क्यांपेक्षा जास्त ओलावा नसावा. कोठ्या सूर्यप्रकाशात ठेवून स्वच्छ करून वापराव्यात. धान्य साठवणीमध्ये धान्याची पोती जमिनीवर साठवू नयेत. धान्यास ओलावा लागणार नाही, याची काळजी घ्यावी. साठवणुकीसाठी आधुनिक आणि सुधारित कोठ्या वापराव्यात.

## निर्जंतुकीकरण

दरवर्षी साठवण जागेतील छिद्रे चुन्याने बुजवून घ्यावीत. धान्य साठवणीची जागा व आजूबाजूचा परिसर झाडून, धुवून स्वच्छ करावा. सर्व काडीकचरा जाळून नष्ट करावा. सर्व छिद्रे व बिळे काचेचा चुरा भरून नंतर सिमेंटने बंद करावीत.



## नियंत्रणात्मक उपाय...

### अरासायनिक उपाय

- धान्य वाळवणे : धान्य कडक उन्हात वाळवून, धान्याचे तापमान १० ते १२ अंश सेल्सिअसपर्यंत कमी करावे.
- पोती साठवणूक करताना जमिनीपासून योग्य उंचीवर करावी.
- धान्यातील आर्द्रता : धान्यातील आर्द्रता १० टक्क्यांपेक्षा कमी असल्याची खात्री करूनच साठवण करावी.
- उधळणी किंवा चाळणी करणे : साठवणीपूर्वी व साठवणीच्या काळात शक्य तितक्या वेळेस किडलेले खराब दाणे चाळणी व उधळणीद्वारे वेगळे करून घ्यावे.
- हवाबंद जागेमध्ये बियाणे साठवणूक केल्यास त्यामध्ये कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते, त्यामुळे ऑक्सिजन न मिळाल्यामुळे कीड लागत नाही.
- धान्य साठवताना कडूलिंबाच्या किवा सीताफळाच्या पानांचा २ ते ३ ठिकाणी ५ ते ७ सें. मी.चा थर द्यावा. बियाण्यासाठी १ ते २ टक्के कडूनिंब बियाची पावडर मिसळावी.
- पुदिन्याच्या पानाची भुकटी, राख ०.५ टक्के मिसळल्यास किडीपासून संरक्षण होते. धान्यात राख मिसळल्यास किडींच्या श्वसनामध्ये बाधा येऊन, किडी गुदमरून मरतात.
- भुंगेऱ्यांच्या नियंत्रणासाठी मीठ मिसळून किवा कांदे ठेवून साठवण करावी. धान्याच्या कोठीत साबण वडी ठेवावी.
- धान्याला १ चमचा प्रति किलो या प्रमाणात गोडतेल चोळावे. १ क्विंटल धान्यासाठी ५०० ते ७५० मिलि तेल वापरावे. त्यासाठी एरंडी, भुईमूग, खोबरेल किंवा मोहरी तेल वापरावे. तेलामुळे किडीची अंडी उबण्यास प्रतिबंध होतो.

## कीड नियंत्रणासाठी सापळा

कोणत्याही सजीवास जगण्यासाठी हवेची आवश्यकता असते. ही हवा मिळवण्यासाठी किडी सापळ्याकडे आकर्षित होतात आणि अडकतात...

### सापळ्याचे घटक...

- मुख्य नळी : स्टीलची एका बाजूला झाकण असलेली तीन सें.मी. व्यासाची पोकळ नळी आहे. या नळीवर दोन मि. मी. आकाराची छिद्रे आहेत. हा सापळा धान्यात ठेवल्यावर या छिद्राद्वारा किडी सापळ्यात अडकतात.
- कीटक अडकणारी नळी : मुख्य नळीच्या एका बाजूला जोडण्यात आलेली प्लॅस्टिकची ही एक नळी आहे. या नळीला नरसाळ्याचा आकार देण्यात आलेला आहे. मोठा गोलाकार भाग मुख्य नळीला जोडला आहे. लहान गोलाकार भाग खालच्या दिशेने करण्यात आलेला आहे. या नळीला लहान गोलाकार भागात गुळगुळीत बाजू असलेला प्लॅस्टिकचा शंकू बसवला आहे. धान्यातील कीड मुख्य नळीच्या छिद्रामधून आत आल्यानंतर ती कीड अडकण्याच्या नळीमधून थेट शंकूमध्ये जमा होईल. या शंकूला आटे असून, किडी अडकण्याच्या नळीवर सहजपणे लावता व काढता येतो. गुळगुळीत बाजूने किडींना बाहेर पडता येत नाही.

### धान्यात असा ठेवा सापळा

सापळा धान्यामध्ये पांढरा शंकू खाली येईल अशा पद्धतीने उभा ठेवावा. वरचे हिरव्या रंगाचे झाकण हे धान्याच्या पातळीशी समान ठेवावे. आठवड्यातून एकदा या सापळ्याचा शंकू काढून जमलेल्या किडी नष्ट कराव्यात. पुन्हा सापळा याच पद्धतीने धान्यात ठेवावा.

### सापळ्याची वैशिष्ट्ये

वापरण्यास सुलभ, आर्थिकदृष्ट्या परवडतो. देखभालीचा खर्च नाही, वर्षानुवर्षे वापरता येतो. कुठल्याही रासायनिक घटकांचा वापर नाही. कीड नियंत्रण सापळ्याचे निष्कर्ष कीड सापळा वापरलेल्या धान्यामध्ये किडींची संख्या तीन पट कमी आणि किडलेल्या दाण्यांची संख्या २.४ पटीने कमी दिसली. उलट सापळा न वापरलेल्या धान्यामध्ये प्रति किलो वजनामध्ये कीड सापळा वापरलेल्या धान्याच्या वजनापेक्षा ३.३ पट घट झाल्याचे प्रयोगात आढळले.

## या किडींमुळे मोठे नुकसान...

**बियाणे, धान्य उन्हामध्ये वाळवून हवेशीर साठवावे. साठविण्यासाठी बांबू किंवा पॉलिथिनच्या तळवटाचा वापर करावा. धान्य आणि बियाणे साठविण्यासाठी आधुनिक हवाबंद कोठ्यांचा वापर करावा. आपल्याकडे साठवलेल्या धान्याचे किडीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. धान्य साठवणुकीत होणाऱ्या नुकसानीपैकी मुख्य नुकसान किडी आणि उंदरामुळे होते. किडींच्या प्रादुर्भावाची सुरुवात कणसांवर किडींनी दिलेल्या अंड्यापासून, खळ्यापासून, साठविलेल्या जुन्या धान्यापासून, वाहनाद्वारे आणि पोत्यातून होतो. या मध्ये प्रामुख्याने भुंगे वर्गीय व पतंग वर्गीय किडींचा समावेश होतो.**

### भुंगेवर्गीय किडी

- सोंडे : ही कीड गहू, मका, ज्वारी, तांदूळ इत्यादी तृणधान्यातील प्रमुख कीड आहे. किडींचा प्रौढ (सोंडा) आणि अळी दाणे पोखरून नुकसान करते. प्रौढ गर्द तपकिरी किंवा काळा असून त्याचे तोंड लांबट निमुळते असते. त्याला सोंड असे म्हणतात. सोंड्याची लांबी १ ते ३ मिमी असते. अळी काळसर किंवा पांढऱ्या रंगाची असून, पाठीवर चार फिक्कट पिवळे पट्टे असतात. किडीचा जीवनक्रम एक ते दीड महिन्यात पूर्ण होतो. या किडीचा प्रादुर्भाव शेतातून म्हणजेच पक्व होणाऱ्या दाण्यातून सुरू होतो.
- खपरा भुंगा : ही कीड प्रामुख्याने साठवलेल्या गव्हात आढळून येते. या किडीची अळी दाण्याचे नुकसान करून बियाण्याचा अंकुर खाते. त्यामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते. प्रौढ २ ते ३ मिमी लांब असून त्याचा रंग पांढुरका बदामी असतो. अंगावर लालसर केसाचे झुपके असतात. किडीचा जीवनक्रम २ ते ९ महिन्यांत पूर्ण होतो.
- कडधान्यावरील भुंगेरा : ही कीड मुख्यतः तूर, मूग, उडीद, चवळी, हरभरा इत्यादी कडधान्यामध्ये आढळते. या भुंगेऱ्याची अळी दाणे पोखरून उपजीविका करते. भुंगेरे ४.५ मिमी लांब असून हृदयासारख्या आकाराचे असतात. भुंगेऱ्याच्या पाठीवरील मध्यभागी दोन फिक्कट पांढरे ठिपके असतात. ही कीड २५ ते ४० दिवसात आपला जीवनक्रम पूर्ण करते. किडीचा प्रादुर्भाव शेतातून सुरू होत असल्याने साठविलेले कडधान्य आणि बियाण्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.
- दातेरी भुंगा : ही कीड गहू, बाजरी, इत्यादी तृणधान्यांचे फुटके दाणे व पिठावर जागते. प्रौढ किडीच्या शरीरावर दोन्ही बाजूंनी दाता सारखी रांग असून हिचा रंग पांढरा असतो. ही कीड ४० ते १२० दिवसात आपला जीवनक्रम पूर्ण करते.

### पतंगवर्गीय किडी

- दाण्यावरील पतंग : ही कीड प्रामुख्याने भात, ज्वारी तर कधी कधी गव्हात आढळते. या किडीचा रंग पिवळसर तपकिरी, पंख लांबट व लांबी १ ते २ सेंमी. असते. अळीचे डोके पिवळे असून रंग पांढुरका असतो. अळी दाण्यात राहून धान्य पोखरते. या किडीचा प्रादुर्भाव शेतातून होतो. किडीचा जीवनक्रम ४ ते ५ आठवड्यात पूर्ण होतो.
- तांदळावरील सुरसा/पतंग : या किडीचा प्रौढ करड्या तपकिरी रंगाचा असून लांबी २ ते ३ सेंमी असते. पूर्ण वाढ झालेली अळी मळकट पांढऱ्या रंगाची असते. सुरुवातीस लहान आळी फुटके दाणे व पीठ खाते. मोठी आळी अखंड दाण्याचे भक्षण करते. ही आळी तोंडाद्वारे धागे काढून फुटके दाणे किंवा पिठाच्या भोवती जाळे तयार करून त्यातच कोषावस्थेत जाते. किडीचा जीवनक्रम ६० ते ८० दिवसात पूर्ण होतो. ही कीड तांदूळ, ज्वारी, बाजरी, पीठ, रवा,मैदा इत्यादीवर उपजीविका करून नुकसान करते.
- कोळी : कोळी ओल्या धान्यावर उपजीविका करतो. याच्या प्रादुर्भावामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते.
- उंदीर : उंदीर मोठ्या प्रमाणात धान्याचे नुकसान करतात. उंदीर हे खाण्यापेक्षा अकरा पटीने धान्याचे नुकसान करतात.



## शॉर्ट न्यूज

### विशाळगड घटनेचा बोधेगावात निषेध

**बोधेगाव :** कोल्हापूर जिल्ह्यात विशाळगड परिसरात झालेल्या हल्ल्याचा शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे निषेध करण्यात असून, याबाबतचे निवेदन सर्व मुस्लिम, दलित व बहुजन समाज बांधवांच्या वतीने बोधेगाव पोलीस दूरक्षेत्रातील पोलिसांना देण्यात आले आहे. सदर घटनेत काही मुस्लिम बांधवांवर हल्ला झाला तसेच जातीयवादी लोकांनी प्रार्थनास्थळाची तोडफोड केली असून, या घटनेतील मुख्य सूत्रधारास तत्काळ शोधून कठोर शिक्षा करावी, अशी ही प्रमुख मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### रमाई आंबेडकर चौक नामकरण करावे

**राहुरी :** येथील बारागाव नांदूर रस्त्यावर डिग्रस फाटा येथील चौकास त्यागमूर्ती रमाई आंबेडकर चौक नाव देऊन त्या ठिकाणी कमानीची उभारणी करण्याची मागणी निवेदनाद्वारे प्रशासनाला करण्यात आली. सदर मागणीचे निवेदन तहसीलदार नामदेव पाटील, मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिले. निवेदनावरवर अनुसंगम शिंदे, गणेश पवार निसार पिंजारी, नाना जोशी, प्रवीण पुरोहित, हरिदास जाधव, रहमान शेख, दीपक काजळे, कादर शेख, छाया अनुसंगम शिंदे तसेच डिग्रस व बारगाव नांदुर येथील ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

### अबितखिंडमध्ये ५०० झाडांचे वृक्षारोपण

**अकोले :** निसर्ग व पर्यावरण मंडळाच्या वतीने प्रमोद दादा मोरे यांच्या प्रेरणेने व अबितखिंड येथे विद्यार्थी, शिक्षक, महिला, शेतकरी यांच्या सामूहिक उपक्रमातून अबितखिंड भैरवनाथाच्या पंचक्रोषी मध्ये ५०० झाडांचे वृक्षरोपण करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी कृषी अधिकारी श्री पवार मुख्याध्यापक डी. डी. फापाळे, नाशिक येथील श्री देशमुख भैरवनाथ सेवा मंडळाचे अध्यक्ष रामनाथ भोजने, सचिव सुनील शिंदे, खजिनदार लालू भोजने, सरपंच यमुनाताई घनकुटे, ग्रामसेवक सुकटे भाऊसाहेब, माजी सरपंच भानुदास गोडे आदी उपस्थित होते.

### बालमटाकळी जि. प. शाळेचा कायापालट

**शेवगाव :** तालुक्यातील बालमटाकळी येथील ग्रामपंचायतीच्या सहकार्याने जिल्हा परिषद आदर्श शाळा बालमटाकळीचा संपूर्ण कायापालट झाला आहे. पंधराव्या वित्त आयोगातून शाळेला ५५ इंची पाच स्मार्ट एलईडी देण्यात आल्या. तसेच शाळेतील पाच वर्ग खोल्यांचे आतून व बाहेरून रंगकाम करून भिंती बोलक्या करण्यात आल्या. त्याचप्रमाणे शाळेला तीन हॅन्डवॉश स्टेशन देण्यात आले. तसेच धनगुडे वस्ती येथील शाळा व बालंबिकानगर शाळा यांनाही प्रत्येकी एक हॅण्ड वॉश स्टेशन देण्यात आले. ग्रामपंचायतच्या सहकार्यामुळे शाळा डिजिटल व ई लर्निंग युक्त झाली आहे.

### सिद्धीविनायकाचे सपत्नीक दर्शन

**कर्जत :** अष्टविनायकांपैकी असलेले सिद्धटेक हे तीर्थक्षेत्र भाविकांसाठी श्रद्धास्थान आहे. येथील विविध समस्या तसेच कामांसदर्भात सविस्तर चर्चा करण्यासाठी पुढील महिन्यात बैठकीचे नियोजन करू, अशी स्पष्टोक्ती जिल्हाधिकारी डॉ. सिद्धाराम सालीमठ यांनी केली. त्याचबरोबर सिद्धटेकशी संबंधित निर्णय पुढील बैठकीनंतरच घेण्याच्या सूचनाही त्यांनी तहसीलदार बिराजदार यांना केल्या. जिल्हाधिकारी डॉ. सालीमठ यांनी आज सिद्धीविनायकाचे सपत्नीक दर्शन घेतले. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

# मोटारसायकल चोरी, पाच आरोपींना अटक

## तीन गॅरेज चालकांनाही केले गजाआड

**राहुरी : प्रतिनिधी**

**मोटारसायकल चोरीतील पाच जणांची दुसरी टोळी राहुरी पोलिसांनी जेरबंद केली. याप्रकरणी दोन आरोपींसह चोरलेल्या मोटरसायकलचे चेसिस नंबर, इंजिन नंबर वेगवेगळे पार्ट खोलून वेगवेगळ्या गाड्यांना लावणारे तीन गॅरेज चालकांना राहुरी पोलिसांनी गजाआड केले.**



राहुरी पोलिस स्टेशन हद्दीतील चोरी गेलेल्या मोटारसायकलचा शोध सुरू असताना, पोलिसांना आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज मिळाले होते. त्याआधारे राहुरी पोलिसांनी आरोपी विशाल प्रभाकर साठे व बबलू बाळासाहेब बर्डे (रा. ब्राह्मणी, ता. राहुरी) यांनी अटक केली. त्यांनी चोरलेल्या मोटरसायकलचे चेसिस नंबर, इंजिन नंबर वेगवेगळे पार्ट खोलून वेगवेगळ्या गाड्यांना लावणारे तीन गॅरेज चालक रवी राघू सूर्यवंशी, कोहिनूर सोपान पवार, सोमनाथ सुरेश वैरागर (सर्व रा. ब्राह्मणी) यांनाही जेरबंद केले.

राहुरी न्यायालयात बुधवारी आरोपींना हजर केले असता, त्यांना सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. पोलिस कोठडीदरम्यान आरोपींकडून एकूण सात मोटरसायकलीचे इंजिन नंबर, चेसिस नंबर जप्त करण्यात आले. या गुन्ह्यातील फरार आरोपी अशोक रखमाजी पिंपळे (रा. मानोरी) व कृष्णा संजय वैरागर (रा. ब्राह्मणी) यांचा राहुरी पोलीस शोध घेत आहेत. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र शिंदे, पोलिस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे, सहाय्यक फौजदार तुळशीराम गीते, पोलिस हेडकॉन्स्टेबल सुरज गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# गोदावरी नदी दुथडी भरून वाहू लागली

## नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून १२ हजार क्युसेकने विसर्ग

**कोपरगाव : प्रतिनिधी**

**शहरासह तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून रिमझिम पाऊस होत असून या पावसामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. नाशिक जिल्ह्यातील धरण पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असल्याने गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला. त्यामुळे कोपरगाव, राहाता, श्रीरामपूरसह मराठवाड्याचा पाणी प्रश्न काही अंशी शमणार आहे. सध्या गोदावरी नदी १२ हजार क्युसेक पाण्याने प्रवाहीत झाली आहे.**



कोपरगाव तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून थोडीफार विश्रांती घेत पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. सोयाबीन, मका, ऊस, कापूस पिकांना संजीवनी मिळाली. हा पाऊस झाला नसता, तर शेतकऱ्यांची अडचण निर्माण झाली असती. या शिवाय कोपरगाव शहराला बारा दिवसाआड पाणी पुरवठा केला जात होता. आमदार आशुतोष काळे यांनी पाटबंधारे विभागास ओव्हरफ्लोचे पाणी डाव्या व उजव्या कालव्यात सोडण्याच्या सूचना केल्या.

कोपरगाव नदीपात्रात पोहोचले पाणी पाटबंधारे विभागानेही डावा व उजवा कालव्यात पाणी सोडल्याने शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. नाशिक जिल्ह्यातील धरण पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. नाशिक जिल्ह्यातील धरणातील साठ्यात वाढ होत आहे. यामध्ये गंगापूर धरण ४९.९५ टक्के, दारणा ८१.३७ टक्के, कडवा ८१.५८ टक्के, पालखेड २४.३५ टक्के, मुकणे २७.७८ टक्के, करंजवण ५.५९ टक्के, गिरणा ११.७४ टक्के, हतनूर ३३.०२ टक्के, वाघूर ६३.३८ टक्के भरले. त्यामुळे दारणा धरणातून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. बुधवारी रात्री नऊ वाजता २ हजार ४२१ क्युसेकने सुरू असलेला विसर्ग गुरुवारी सकाळी सात वाजता ३ हजार १५५ क्युसेक करण्यात आला. दुपारी एक वाजता तो वाढवून १० हजार १३२, तर सायंकाळी पाच वाजता ११ हजार ९४६ क्युसेक करण्यात आला. हे पाणी कोपरगाव शहरातील गोदावरी नदीपात्रात पोहोचले आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी मनसेने रणसिंग फुंकले

**मुंबई : प्रतिनिधी**

**येणाऱ्या आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रणशिंग फुंकले आहे. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज ठाकरे यांनी मनसे नेत्यांकडून प्रत्येक मतदारसंघाचा आढावा घेतला. हा आढावा घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. मनसे २२५ ते २५० जागा लढणार आहे. यावेळेला मनसेचे पदाधिकारी काहीही करुन सत्तेत बसवणारच, हे घडणार आहे, असा शब्द राज ठाकरे यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिला.**



लाडकी भाऊ आणि बहीण एकत्र राहिले असते तर दोन्ही पक्ष टिकले असते. माझी सर्वांना विनंती आहे, जिथे पूर आलाय तिथे लोकांना मदत करा. मूळ महाराष्ट्राचे प्रश्न आहेत, ते आपले निवडणुकीचे मुद्दे असायला हवेत, असे राज ठाकरे म्हणाले.

मी काल आढावा घेत होतो. मला कळेना कोण कुठला आमदार आहे. पुढे राजकीय घमासान होईल, इतकं होईल की ना भूतो न भविष्य असेल. मला कळलं आपले लोकं काही कुठे जाणार आहेत तर मीच रेड कार्पेट टाकतो. त्यांचंच खरं नाही तर तुम्हाला कुठे बसवतील? असा सवाल राज ठाकरे यांनी विचारला.

आपण सर्व्हे करतोय पक्षातील काही लोकं पाठवून. पहिला सर्व्हे झाला, तुमच्या मतदारसंघात ते लोक येऊन गेलेत. आता पुढे ते लोक येऊन तुम्हाला भेटतील, तुमच्या इथली परिस्थिती त्यांना सांगा. निवडून येण्याची परिस्थिती असेल त्यालाच तिकीट मिळेल. कोणालाही तिकीट दिले जाणार नाही, पैसे काढणाऱ्यांना तिकीट नाही. जिल्हा अध्यक्ष शहर अध्यक्ष यांनी माहिती प्रामाणिकपणे द्या, दिलेली माहिती चेक केली जाईल, असे राज ठाकरे म्हणाले.

(पान १ वरून)

### राजे शिवाजी पतसंस्थेचे ठेवीदार नगर-पुणे महामार्ग रोखणार!

नसल्याबाबत पोलीस प्रशासनास कळविण्यात आले होते. सध्या आझाद ठुबे यांना सावकारी कायद्यानुसार अटक करण्यात आली आहे, परंतू त्यांनी ठेवीदारांचा विश्वासघात केल्यामुळे संस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच व्यवस्थापक यांच्यावर महाराष्ट्र वित्तीय संस्थांमधील हितसंबंधाचें संरक्षण अधिनियम १९९९ नुसार गुन्हा दाखल होणे आवश्यक असतानाही तो दाखल करण्यात आलेला नाही. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी पारनेरचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांना गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत. गुन्हा दाखल न झाल्यास संस्थेचे २ हजार ठेवीदार तसेच त्यांचे कूटूंबिय दि. ८ ऑगस्ट रोजी नगर-पुणे महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करतील असा इशारा देण्यात आला आहे.

### सावेडीचे तलाठी, मंडलाधिकारी निघाले लाचखोर!

सापळा अधिकारी तत्कालीन पोलीस निरीक्षक शरद गोर्डे, सापळा पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपधीक्षक प्रविण लोखंडे, दाखल व तपास अधिकारी श्रीमती छाया देवरे, यांच्यासह पथकातील कर्मचारी पो. कॉ. सचिन सुद्रुक, पो. कॉ. बाबासाहेब कराड, चालक हे कॉ. हरून शेख यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या नाशिक परीक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक श्रीमती शर्मिष्ठा घारगे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेडडी यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा यशस्वी केला.

### करोनानंतर हंता विषाणूची दहशत; उंदरांकडून पसरतोय जीवघेणा आजार

उंदरांमुळे पसरतो. एखाद्या व्यक्तीनं उंदरांच्या मल-मुत्रास स्पर्श केल्यानंतर स्वत:च्या चेहऱ्याला किंवा शरीराला हात लावल्यास हंता विषाणूची लागण होण्याची शक्यता वाढते. हंता विषाणू एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे जात नाही. तो या विषाणूमुळे संसर्गजन्य आजार होत नाही. पण हा विषाणू जगातील कोणत्याही भागात पसरु शकतो.

हंता विषाणूची लक्षणं काय?

हंता विषाणूची लागण झाली असल्याचं कळण्यास एक ते आठ आठवड्यांचा कालावधी लागतो. आजाराची बाधा झाल्यानंतर सुरुवातीला ताप, अशक्तपणा, मांसपेशींमध्ये वेदना जाणवतात. जांघेकडेचा भाग, पार्श्वभाग, पाठ आणि कधी कधी खांदे दुखतात. याशिवाय श्वास घेण्यास त्रास होतो. छाती भरुन आल्यासारखं वाटतं. कारण फुफ्फुस द्रवपदार्थानं भरुन जातात. काही दिवस उलटल्यानंतर त्रास वाढत जातो. रक्तदाब, किडनी निकामी होण्याची समस्या उद्भवू शकते. हा आजार बरा होण्यासाठी काही आठवडे ते काही महिन्यांपर्यंतचा कालावधी लागू शकतो.

विषाणूपासून बचाव कसा करायचा?

हंता विषाणूचा मृत्यूदर ३८ टक्के आहे. या आजारावर काही विशिष्ट उपचार नाहीत. संक्रमण झाल्याचं निदान लवकर झाल्यास वैद्यकीय मदत देवून रुग्णाला बरं करता येतं. हंता विषाणूची लागण होऊ नये म्हणून उंदरांशी संपर्क कटाक्षानं टाळा. घरं आणि कार्यालयं स्वच्छ ठेवा. तिथे उंदीर येणार नाहीत याची काळजी घ्या. घरात उंदीर शिरु नयेत म्हणून दारं, खिडक्या बंद करा. कीटकनाशकांचा वापर करा. धुळीच्या संपर्कात येणं टाळा. ग्लोव्हस, मास्क वापरा. साफसफाई केल्यानंतर हात स्वच्छ धुवा.

### लाडक्या बहीणींना पैसे देणार कोठून?

विचारण्यात आला आहे. विशेष म्हणजे अर्थ मंत्रालय अजित पवारांकडे आहे. ते स्वत: गेल्या तीन आठवड्यांपासून अनेक कार्यक्रमांमधून लाडकी बहीण योजनेचा आवर्जून उल्लेख करत आहेत. योजनेसाठी अर्थमंत्र्यांची बॅटिंग सुरु असताना त्यांचाच विभाग योजनेवर हरकत घेत असल्याचे आश्चर्यकारक चित्र पाहायला मिळत आहे.


महायुतीच्या मंत्री, खासदारांची सडकून टीका

अर्थ मंत्रालयाच्या आक्षेपावर भाजप नेते आणि वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जोरदार टीका केली आहे. राज्यातील अडीच कोटी महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळणार आहे. या महिला काही ऍमेझॉनवर शॉपिंग करणाऱ्या नाहीत. त्या त्यांच्याच आसपास असलेल्या दुकानातून, मंडईतून खरेदी करतात. त्यांच्या हातात पैसा आल्यास राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. पण महिलांवर अन्याय करायची सुप्त इच्छा असलेल्यांना आता तिजोरीची चिंता सतावू लागली आहे. गोरगरिब महिलांच्या खात्यात पैसे जाण्याची वेळीच तुम्हाला तिजोरी आठवते का?, असा सवाल मुनगंटीवार यांनी विचारला. विशेष म्हणजे मुनगंटीवार यांनी फडणवीस मुख्यमंत्री असताना अर्थमंत्रिपद भूषवलेलं आहे.

ठाण्याचे खासदार आणि शिंदेसेनेचे नेते नरेश म्हस्के यांनीही लाडकी बहीण योजनेला विरोध करणाऱ्यांवर सडकून टीका केली. राज्यावर कर्जाचा बोजा आहे म्हणून योजना राबवायच्या नाहीत असं काही नाही. ही योजना दिनदलित, गोरगरिब, कष्टकरी महिलांसाठी आहे. अर्थ खात्यानं त्यांचं काम केलं आहे. जमाखर्च किती, कर्ज किती हे पाहणं त्यांचं काम आहे. ते त्यांनी केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतलेला निर्णय योग्य आहे. त्यामुळे ही योजना सुरु राहील, असे म्हस्के म्हणाले.

## काव्यरंग

### कुणी कुणाचे नाही



*कुणी कुणाचे नाही जगती*
*कुणी कुणाचे नाही*
*फुल झाडाचे नाही*
*आणिक*
*झाड फुलांचे नाही*
*पुष्पाचेही फलन होतसे*
*फळही ठरले नाही*
*पुष्प वेगळे, फळहि वेगळे*
*झाडहि उरले नाही*

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

### निवडणुकीत नावे कशी गहाळ झाली? कुणाच्या आदेशाने झाली?

**भाजपचे शिष्टमंडळ थेट निवडणूक आयोगात; चौकशीची मागणी**

**मुंबई : प्रतिनिधी**

**सन २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या मतदारांची नावे यादीत होती. ती २०२४ च्या निवडणुकीत गहाळ कशी झाली? का झाली? कुणाच्या आदेशाने झाली? या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करीत भाजपच्या शिष्टमंडळाने केंद्रीय निवडणूक आयुक्तांची दिल्लीत भेट घेतली.**

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांना भेटलेल्या शिष्टमंडळामध्ये भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजप अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार, खासदार धोत्रे, हेमंत वणगा आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांचा समावेश होता. सुमारे एकतास ही बैठक झाली.

या भेटीबद्दल माहिती देताना आमदार आशिष शेलार यांनी सांगितले की, मुंबईतील जवळजवळ ११०० गृहनिर्माण सोसायटीमध्ये बुथ निर्मितीच्या कामाने गती घेतली आहे. तसेच २५ जुलै पर्यंत मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर करण्यात आला त्याचा कालावधी वाढवून देण्यात यावा अशी विनंती आम्ही केली त्यानुसार आयोगाने ७ दिवस मतदार नोंदणी अभियानात वाढ करण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे अंतिम यादी जाहीर करण्याची मुदतही सात दिवस पुढे ढकलण्यात आली असून आता २ ऑगस्ट पर्यंत मतदार नोंदणी करता येणार आहे. त्याचा मतदारांना फायदा होईल, असेही आमदार आशिष शेलार यांनी सांगितले. याबद्दल सकारात्मक प्रतिसाद आयोगाने दिल्याची माहिती आमदार आशिष शेलार यांनी दिली आहे. तसेच मतदारांनी आपले नाव यादीमध्ये बिनचूक कसे नोंदले जाईल, ओळखपत्र, फोटो बिनचूक कसे येतील याबाबत काळजी घ्यावी, असे आवाहन आमदार आशिष शेलार यांनी केले आहे.






# गंधाडे परिवाराच्या मांडव डहाळ्यांनी जुन्या परंपरेला उजाळा!

## पारनेर शहरातील मांडव डहाळ्यांची मिरवणूक ठरली लक्षवेधी

पारनेर : प्रतिनिधी

**लग्न समारंभातील अनेक जुन्या रूढी परंपरा लोप पावत चालल्या असून पूर्वी आठ ते पंधरा दिवस चालणारा विवाह समारंभ एकाच दिवशी आटोपला जातो आहे. त्यामुळे अनेक जुन्या रूढी परंपरांना फाटा देण्यात येत असून लोप पावत चाललेल्या या परंपरेला शहरातील गंधाडे परिवाराने उजाळा दिला.**

पारनेर नगरपंचायतीचे मा. नगरसेवक किसन गंधाडे यांचे चिरंजीव आदित्य व शहरातीलच औटी परिवारातील मोनिका यांचा विवाह नुकताच पार पडला. या विवाहाच्या आदल्या दिवशी गंधाडे परिवाराने मांडव डहाळ्याची मिरवणूक काढत जुन्या परंपरेला उजाळा दिला. पूर्वीच्या परंपरेप्रमाणे मांडव डहाळे आणण्यासाठी बैलगाडयांचा वापर होत असे. गंधाडे परिवाराचे मांडव डहाळे बैलगाडयांमधून आलेच परंतू अधुनिक काळात शेतीसाठी उपयोगी येणाऱ्या ट्रॅक्टर तसेच जेसीबीचाही त्यात समावेश होता.



मा. नगरसेवक किसन गंधाडे यांचे चिरंजीव आदित्य यांच्या विवाहानिमित्त मांडव डहाळयांचे आयोजन करण्यात आले होते.

### जुणे रिती-रिवाज जपण्यात आनंद

आपल्या वाड वडिलांनी जुन्या परंपरांचे जतन केले. सध्याच्या जमान्यात जुणे रिती रिवाज काळाच्या पडद्याआड जाउ लागले असून नवी पिढी त्यापासून अनभिज्ञ आहे. या पिढीला जुन्या रिती-रिवाजांची माहीती व्हावी. त्याचा आनंद घेता यावा यासाठी आम्ही मांडव डहाळयांचा कार्यक्रम आवर्जुन आयोजित केला. जुणे रिती-रिवाज जपण्यातच आम्हाला आनंद आहे.

किसन गंधाडे, राजेंद्र तारडे, पोपट तारडे

### काय आहे मांडव डहाळयाची परंपरा ?

ज्यांच्या घरी लग्न आहे त्यांच्या दारासमोर टाकलेल्या मांडवावर छत म्हणून लिंब, उंबर, वड, आंबा आदी झाल्यांच्या डहाळया अर्थात फांद्या टाकल्या जातात त्यास मांडव डहाळे म्हणतात. परिसरातील भाउबंद, सोयरे, धायरे तसेच आप्तेष्ट, मित्र परिवार बैलगाडीतून ते घेउन येतात. हळदी समारंभाआगोदर मांडव डहाळयांचा कार्यक्रम पार पडतो. मांडव डहाळे घेउन येणारांसाठी पुर्वी पिठलं भाकरीचा बेत असे. बैलगाडया घरी पोहचल्यानंतर सुवासणी त्यांचे औक्षण करतात. गाणी गायली जातात. गाडीवानांचा मान सन्मान केला जातो.

# एसटीच्या नगर विभागासाठी २०० ई बसेसची मागणी

## विभाग नियंत्रक सपकाळ यांची माहिती | दिवाळीपर्यंत ई बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होण्याची अपेक्षा

पारनेर : प्रतिनिधी

**एसटीच्या नगर विभागासाठी २०० ई बसेसची मागणी करण्यात आली आहे. दिवाळीपर्यंत या बसेस नगर विभागाच्या ताफ्यात दाखल होणे अपेक्षित आहे.अशी माहिती विभाग नियंत्रक मनिषा सपकाळ यांनी दिली.**

विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश धनराळे,प्रभारी आगार व्यवस्थापक जगदीश क्षेत्रे, वाहतूक निरीक्षक इंद्रनील कुसकर,अमित हंपे, सहायक कार्यशाळा अधीक्षक डॅनियल आरोडे उपस्थित होते. प्रवाशी राजा दिनानिमित्त विभाग नियंत्रक सपकाळ यांनी पारनेर आगाराला भेट देऊन प्रवाशांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.एसटीच्या ताब्यात सध्या जुन्या गाड्यांची संख्या वाढलेली असली तरी एसटीच्या नगर येथील विभागीय तसेच आगारांमधील कार्यशाळेत गाड्यांची नियमित देखभाल दुरुस्ती करण्यात येते.त्यामुळे गाड्यांमध्ये रस्त्यावर बिघाड होण्याचे प्रमाण कमी असल्याचा दावा सपकाळ यांनी केला.

पारनेर आगारात गाड्यांची देखभाल,दुरुस्ती चांगल्याप्रकारे केली जाते. त्यामुळे या आगारातून नाशिक, मुंबई,पुणे या लांब पल्ल्याच्या मार्गांवरील फेऱ्या व्यवस्थीत सुरू आहेत.पारनेर - सेल्वास या आंतरराज्य मार्गावरील फेऱ्याही विनाखंड सुरू असल्याचे सपकाळ यांनी यावेळी निदर्शनास आणून दिले.

बसस्थानक तसेच कार्यशाळा सफाईसाठी यापूर्वी नेमलेल्या ठेकेदाराने व्यवस्थीत काम केले नाही.सध्या सफाईच्या ठेक्याची मुदत संपली आहे.पुन्हा जुन्या ठेकेदाराला सफाईचे काम देण्यात येणार नाही.सध्या स्थानिक पातळीवर सफाई कामगारांकडून सफाईचे काम करून घेतले जात असल्याचे विभाग नियंत्रक सपकाळ यांनी सांगितले.

एसटीच्या बिघाडाचे प्रमाण कमी राहील यासाठी प्रयत्न करावेत, गळक्या गाड्या मार्गावर पाठवू नयेत, बसस्थानकाच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे अश्या सूचना सपकाळ यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



प्रवासी राजा दिनानिमित्त विभाग नियंत्रक मनिषा सपकाळ यांनी पारनेर बसस्थानकावर प्रवाशांशी संवाद साधला.

### खराब रस्त्यांमुळे बस नादुरुस्त

नगर विभागात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर एसटीच्या फेऱ्या चालवल्या जातात.अनेक मार्गांवरील रस्ते खराब आहेत.त्यामुळे गाड्यांच्या बिघाडाचे प्रमाण वाढते.मात्र विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी खराब रस्त्यांवरून फेऱ्या सुरू ठेवाव्या लागतात.पावसाळ्यात रस्त्यांची अवस्था अधिक बिकट होते.अपघाताची शक्यता वाढते.स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाला रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत सूचना द्याव्यात,त्याचा पाठपुरावा करावा.रस्ते चांगले असतील तर एसटीच्या फेऱ्या व्यवस्थीत सुरू राहतील. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.गाड्या बिघाडाचे प्रमाण कमी होईल.

मनिषा सपकाळ, विभाग नियंत्रक,एसटी अहमदनगर विभाग.

# कारगिल दिनानिमित्ताने हिवरेबाजारला वृक्षारोपण

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**कारगिल दिनानिमित्ताने आदर्श गाव हिवरे बाजार येथे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळेस पद्मश्री डॉ पोपटराव पवार कार्याध्यक्ष आदर्श गाव योजना महाराष्ट्र राज्य ,छबूराव ठाणगे चेअरमन हिवरे बाजार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था ,रो.ना.पादीर ग्रा.प.सदस्य,एस.टी.पादीर सर ,भास्कर सिनारे ग्रामविकास अधिकारी,माजी सैनिक धर्मराज ठाणगे,माजी सैनिक राजेंद्र सहादू ठाणगे ,माजी सैनिक अशोक भाऊसाहेब ठाणगे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.**



# शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही : कांतीलाल उमाप

## शिक्षण संवाद यात्रेला शिरूर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद



निघोज : प्रतिनिधी

**आजच्या काळात विद्यार्थांची स्पर्धा ही राज्य , देशाच्या सीमा ओलांडून आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचली आहे.१० वी पासूनच उपलब्ध असणाऱ्या विविध शिष्यवृत्तीच्या माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण संवाद यात्रेची मोठी मदत होणार आहे.असे मत निवृत्त माजी सनदी अधिकारी कांतीलाल उमाप यांनी व्यक्त केले.**

ॲड.संग्राम नाथाभाऊ शेवाळे यांनी आयोजित केलेल्या शिक्षण संवाद यात्रेच्या चौथ्या दिवशी जातेगाव बुद्रुक ( ता.शिरूर ) येथे श्री संभाजीराजे माध्यमिक विद्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर ॲड.संग्राम शेवाळे, प्रमुख वक्ते ॲड.दीपक चटप , ॲड.बोधी रामटेके , संस्थेचे उपाध्यक्ष प्रकाश पवार उपस्थित होते.

उमाप म्हणाले संग्राम शेवाळे यांनी तालुक्यात पहिल्यांदा शिक्षण यात्रेचे आयोजन केले ते कौतुकास्पद आहे. त्यासाठी त्यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतलेल्या २ विद्यार्थ्यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित केले आहे.या मार्गदर्शनाचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.

राज्यात अनेक विषयांवर यात्रा निघतात मात्र तालुक्यातील होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली व्हावीत तसेच परदेशातील शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी यात्रेचे आयोजन केले आहे अशी माहिती आयोजक शेवाळे यांनी दिली. ॲड.चटप यांनी स्पर्धेचे युग , बदलत्या काळातील शिक्षणाचे महत्त्व यावर बोलताना वेगवेगळ्या शिष्यवृत्त्यांची माहिती दिली. ते म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन माहितीचे विकेंद्रीकरण व शिक्षणाचे लोकशाहीकरण होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन धोरण निर्मिती मध्ये आपले योगदान द्यावे हा यात्रेचा हेतू आहे. शैक्षणिक माहितीचे विकेंद्रीकरण होणे ही काळाची गरज आहे.विविध शिष्यवृत्तीची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे महत्वाचे आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी नामांकित विद्यापीठांमधून उच्च शिक्षण घेणे गरजचे असल्याचे मत ॲड.रामटेके यांनी व्यक्त केले.










'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com